


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०२ ● अंक : ०३५ ● पुणे ● सोमवार, दि. १६ डिसेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध : बाबाजी काळे 3



भारताची रोजगार क्षमता सात टक्क्यांनी वाढेल 4

# मंत्रिमंडळाचा अखेर शपथविधी

## ४३ पैकी एक मंत्रीपद अद्याप रिक्त

## तिन्ही पक्षांतील अनेक ज्येष्ठांना बाहेरचा रस्ता; ३३ कॅबिनेट, सहा राज्यमंत्र्यांमध्ये १८ नवे चेहरे

**नागपूर (दै. आरंभ पर्व)**

विधानसभा निवडणूक निकालानंतर तीन आठवड्यांनी राज्य मंत्रिमंडळाचा बहुचर्चित विस्तार रविवारी झाला. फडणवीस मंत्रिमंडळात विविध जातीजमातीचे समीकरण साधताना तिन्ही पक्षांनी ज्येष्ठ नेत्यांना धक्का दिला. छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, सुधीर मुनगंटीवार यांच्यासह काही ज्येष्ठ मंत्र्यांना घरचा रस्ता दाखविण्यात आला असून 39 जणांपैकी 18 नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली. नागपूरमधील राजभवनाच्या प्रांगणात राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी 33 कॅबिनेट मंत्री आणि सहा राज्यमंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांचा आधीच शपथविधी झाला होता. हे तीन व आजचे 39 असे एकत्रित मंत्रिमंडळाचे आकारमान 42 झाले आहे. कायद्यानुसार 43 मंत्रिपदांची तरतूद असल्याने एक मंत्रिपद रिक्त ठेवण्यात आले आहे. हे मंत्रिपद कोणासाठी रिक्त ठेवण्यात आले याची नंतर कुजबुज सुरू झाली. मराठा, ओबीसी, आदिवासी, धनगर, अनुसूचित जाती, अल्पसंख्याक, बिगर मराठी अशा सर्व जातीजमातींचा समतोल राखण्यात आला आहे. याशिवाय विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र असा विभागीय समतोल राखण्यात आला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा, चंद्रशेखर बावनकुळे, ॲड. आशीष शेलार, गणेश नाईक, राधाकृष्ण विखे-पाटील, पंकजा मुंडे, अतुल सावे, शिवसेनेचे उदय सामंत, दादा भुसे, शंभूराज देसाई तर राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे, नरहरी झिरवळ, आदिती तटकरे, अनिल पाटील आदींना मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे.



### सरकारमधील नवे चेहरे

- भाजपने सुधीर मुनगंटीवार, रवींद्र चव्हाण यांना वगळून शिवेंद्रराजे भोसले, माधुरी मिसाळ, नितेश राणे, या नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे.
- शिवसेनेने दीपक केसरकर, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार या नेत्यांना भाजपच्या आक्षेपामुळे वगळले. तर राष्ट्रवादी काँग्रेसने ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील यांना पुन्हा संधी दिली नाही.
- नरहरी झिरवळ, बाबासाहेब पाटील, माणिकराव कोकाटे, दत्ता भारणे, मकरंद पाटील यांना अजित पवार यांनी संधी दिली.

### केवळ चार महिलांना संधी

- फडणवीस मंत्रीमंडळात केवळ चार महिलांना स्थान मिळू शकले आहे.
- पंकजा मुंडे, जिंतूरच्या मेघना बोर्डीकर व पुण्यातील माधुरी मिसाळ या तीनही भाजपच्या महिला आमदार आहेत.
- आधीच्या मंत्रिमंडळातील मंत्री आदिती तटकरे यांना राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा संधी दिली आहे.
- शिवसेनेने एकाही महिलेला मंत्रीपद दिलेले नाही.

## ठळक बातम्या

### अजितदादांकडून निकालाचे श्रेय बहिणींना

**बारामती : (आरंभ पर्व)** खरंतर यंदा लाडल्या बहिणींनी मला वाचवले. खोटं सांगणार नाही, लोकसभेचा निकाल लागल्यावर विचार करंत होतो. सरकार तर आलं पाहिजे. 40, 50 आमदार आपल्याबरोबर आलेतं. उद्या ते म्हणतील, हा घेऊन गेला. आमचं वाटुळं केलं. त्यामुळे त्यांचा वाटुळं नको व्हायला आणि आपलंही वाटोळं नको. परंतु गरिबांकरिता लाभाच्या चांगल्या योजना आणल्या. बहिणींनी त्यांच चांगलं स्वागत केंलं, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीच्या निकालाचे श्रेय लाडक्या बहिणींना दिले.

### बाजारभावाच्या 5 पट मोबदला

**पुणे : (आरंभ पर्व)** रिंगरोडसाठी आवश्यक सुमारे 206 हेक्टर क्षेत्राचे संपादन अद्याप बाकी आहे. त्यासाठी आणि यापूर्वीच्या निवाड्याचा मोबदला देण्यासाठी 500 कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. ती पूर्ण करावी, अशी मागणी जिल्हा प्रशासनाने राज्य रस्ते विकास महामंडळाकडे केली आहे. जमीनमालकांनी 15 डिसेंबरपर्यंत संमतीने जमीन दिल्यास बाजारभावाच्या पाचपट मोबदला दिला जाणार आहे. त्यानंतर मात्र सक्तीने भूसंपादन केले जाईल, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. रिंगरोडच्या प्रलंबित भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी नुकतीच बैठक घेतली. या वेळी भूसंपादन समन्वयक कल्याण पांढरे आणि विविध ठिकाणचे भूसंपादन अधिकारी उपस्थित होते.

## मिल कामगारांचा मुलगा तिसऱ्यांदा झाला मंत्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कोथरुड विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून आलेले भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांनी सलग तिसऱ्यांदा कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. पाटील यांचा जन्म मुंबईमध्ये सर्वसामान्य घरात झाला. त्यांचे आई-वडील मिल कामगार होते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता म्हणून पाटील यांनी राजकीय प्रवासाला सुरुवात केली होती. कोथरुड विधानसभा मतदारसंघातून यंदा पाटील यांनी एक लाख मतांनी विजय मिळविला आहे.

सन 2014 मधील देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये चंद्रकांत पाटील यांनी महसूल आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे (सार्वजनिक उपक्रम वगळता) कॅबिनेट मंत्री म्हणून काम पाहिले होते. त्यानंतर महायुतीच्या शिंदे सरकारमध्ये पाटील यांच्याकडे उच्च व तंत्रज्ञान विभागाची जबाबदारी होती. आता फडणवीस सरकारमध्ये चंद्रकांत पाटील यांनी तिसऱ्यांदा कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली आहे.



चंद्रकांत पाटील यांनी सन 2019 ते 2022 मध्ये महाराष्ट्र भाजपचे अध्यक्ष म्हणून काम केले. त्याशिवाय कोल्हापूर, सांगली आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री होते. मराठा आरक्षणासाठीच्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी त्यांच्यावर होती. 2008 साली पुणे पदवीधर मतदारसंघातून विधान परिषद सदस्य म्हणून पाटील यांची निवड झाली. 2014 साली पुणे पदवीधर मतदारसंघातून दुसऱ्यांदा त्यांची आमदार म्हणून निवड झाली. 2019 आणि 2024 साली कोथरुड, विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून पाटील यांची निवड झाली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे समर्पित कार्यकर्ता, महाराष्ट्र संघटन महामंत्री आणि राष्ट्रीय महासचिव पदांवर पाटील यांनी काम केले. 1995-1999 या कालावधीत रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सहकार्यवाह पाटील यांनी काम केले आहे.




# पुण्यातून माधुरी मिसाळ यांना दुसऱ्या महिला राज्यमंत्री होण्याचा मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातून दुसऱ्या महिला राज्यमंत्री होण्याचा मान पर्वतीच्याआमदार माधुरी मिसाळ यांनी मिळवला आहे. पर्वती विधानसभा मतदार संघातून सलग तीन वेळा निवडून आल्यानंतर यंदा चौथ्यांदा आमदार होण्याचा मान त्यांनी मिळवला. त्यानंतर त्यांना मंत्रिमंडळात संधी देण्यात आली असून मिसाळ यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

पुण्यातून काँग्रेसच्या लीला मर्चंट या पहिल्या महिला आमदार म्हणून निवडून आल्या होत्या. त्यांनतर 1978 साली पुलोद सरकार असताना शांती नाईक यांना पहिले महिला मंत्रिपद देण्यात आले होते.

तर आता माधुरी मिसाळ यांनी पहिल्या दुसऱ्या राज्यमंत्री होण्याचा मान मिळवला आहे. 2009 पासून माधुरी मिसाळ पर्वती विधानसभेतून 3 वेळा निवडून आल्या आहेत. 2024 साली निवडून येण्याची त्यांची चौथी वेळ आहे. 2014 च्या निवडणुकीत कोथरुड, पर्वती आणि कसबा विधानसभेतून 3 महिला आमदार निवडून आल्या होत्या. पण त्यावेळी या तीन महिलांना मंत्रिपद देण्यात आले नव्हते. आता मात्र मिसाळ यांना मंत्रिपद दिल्याने पुणेकर भगिनींची मान उंचावली आहे.

कसबा मतदारसंघातून 2007 मध्ये पहिल्यांदा नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. त्यानंतर 2009 मध्ये त्यांना पर्वती मतदारसंघात आमदारकीचं तिकीट मिळाले.

तेव्हापासून त्या पर्वती मतदारसंघाच्या आमदार म्हणून काम करत आहेत. 2009 ते 2024 अशी सलग चार वर्षे त्यांनी पर्वती मतदारसंघातून यश मिळवले. सलग चौथ्या टर्मसाठी पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव महिला आहेत.



### शहरातील पहिल्या महिला मंत्री

पुणे शहरातील आता पर्यत अनेक महिला आमदार झाल्या आहेत. पण महिला आमदारांमध्ये फक्त शांती नाईक यांना संधी देण्यात आली होती. आता माधुरी मिसाळ यांना पुणे शहरातील दुसऱ्या महिला मंत्री होण्याचा मान मिळाला आहे. राज्यात आता पर्यत ९ महिला कॅबिनेट मंत्री तर १२ महिला राज्यमंत्री झाल्या आहेत.

### लांडगे, कांबळे, शिवतारे, कुल या आमदारांना अडीच वर्षांनी मंत्रिपद मिळण्याची शक्यता?

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर आज मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त लागला आहे. पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर आणखी ३ आमदारांना मंत्रिपद देण्यात आले आहे. राज्यात सर्वाधिक म्हणजेच ४ मंत्रीपदे पुण्याला देण्यात आली आहेत. मात्र पिंपरी चिंचवड शहराला एकही मंत्रिपद देण्यात आले नाही. अशातच ज्यांना मंत्रिपदासाठी फोन आले आहेत. त्यांना अडीच वर्षांसाठी ही संधी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुण्यातील इच्छुक असलेल्या आमदारांना अडीच वर्षानंतर मंत्रिपद मिळण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुणे शहरातून कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील, पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांना फोन आले आहेत. तर जिल्ह्यातून इंदापूरचे आमदार दत्ता भरणे यांना संधी देण्यात आली आहे. तर इच्छुकांमध्ये असणारे भोसरीचे आमदार महेश लांडगे, दौंडचे आमदार राहुल कुल, पुरंदरचे आमदार विजय शिवतारे आणि पुणे कॅन्टोनमेंटचे आमदार सुनील कांबळे यांना अडीच वर्षानंतर मंत्रिपद मिळण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.





# बांगलादेश अफगाणिस्तानच्या दिशेने...

बांगलादेशातील उद्रेकाने शेख हसीना सरकार उलथवल्यानंतर तेथे इस्लामिक कट्टरतावाद्यांना हिंसाचार व रक्तपात घडवायला रान मोकळे मिळाले आहे. पाकिस्तान समर्थित कट्टरतावाद्यांनी देशातील अल्पसंख्य असलेल्या हिंदूंना हल्ल्याचे टार्गेट बनवले आहे. हिंदूंना घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे, अनेक मंदिरांवर हल्ले करून तेथील देवदेवतांच्या मूर्तींची तोडफोड करण्यात आली आहे. इस्कॉन मंदिराला आग लावण्यात आली. बांगलादेशातील हिंदूंकडे देशाचे शत्रू म्हणून बघितले जात आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्य लढ्यात भारताचे योगदान सर्वात मोठे होते, पण आज 53 वर्षांनंतर इस्लामिक कट्टरतावाद्यांच्या हिट लिस्टवर भारताचा क्रमांक पहिला आहे. जनतेतील प्रक्षोभ आणि बेलगाम हिंसाचारानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना स्वत:लाच देशातून पलायन करावे लागले आणि त्यानंतर बांगलादेशमध्ये भारत द्वेष आणि हिंदू विरोध उफाळून आला आहे. हिंदूंवर हल्ले होत असताना युनूस सरकार हल्लेखोरांना रोखण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाही. पोलीस बघ्याची भूमिका घेत आहेत. प्रशासन हल्लेखोरांपुढे हतबल झाले आहेत. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांच्या निषेधार्थ भारतात देशभर हिंदू संघटनांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. महाराष्ट्रातही अनेक शहरात हिंदू संघटनांनी शक्तिप्रदर्शन घडवून बांगलादेशातील हिंदूंच्या पाठीशी भारतीय जनता खंबीरपणे उभी असल्याचे दाखवून दिले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात निलेश राणे, नितेश राणे या आमदार बंधूंनी विराट मोर्चा काढून हिंदूंची संघटित ताकद रस्त्यावर उतरवली. बांगलादेशात हिंदूंच्या विरोधात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल जागतिक स्तरावर अनेक देशांनी चिंता प्रकट केली. ब्रिटनच्या संसदेतही हा मुद्दा मांडला गेला. अमेरिकेच्या व्हाइट हाऊसनेही हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराची गंभीर नोंद घेतली. बांगलादेशमध्ये नोबेल पारितोषिक विजेत्या मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार असले तरी ते त्यांचा भारत विरोधी अजेंडा सोडायला मुळीच तयार नाहीत. काश्मीरच्या खोऱ्यात 1990 च्या दशकात पंडितांवर हल्ले होत होते, पंडितांना घरात घुसून ठार मारले जात होते, पंडितांना त्यांच्या परिवारासह अंगावरच्या वस्त्रानिशी खोऱ्याबाहेर पळून जाण्यास भाग पाडले जात होते, हिंदू महिलांवर अत्याचार व बलात्कार झाले. आता त्याच घटना बांगलादेशात घडत आहेत. बांगलादेशातील हिंदूंना तिथे जिणे मुश्कील केले जात आहे. काश्मीरच्या खोऱ्यात हिंदूंवर अत्याचार करणारे इस्लामिक कट्टरतावादी होते आणि बांगलादेशातही तेच आहेत. त्यांच्या पाठीशी पाकिस्तान प्रेरित कट्टरतावादी संघटना व गुप्तचर संघटना आहेत. पाकिस्तानातून या देशात शस्त्रास्त्रे येत आहेत. हसीना शेख यांच्या कट्टर राजकीय विरोधक बेगम खलिदा झिया व पाकिस्तानी अधिकारी यांच्यात संवाद होत असल्याच्याही बातम्या आहेत. शेख हसीना यांना सत्तेवरून पदच्युत केल्यानंतर बांगलादेशच्या माध्यमातून पाकिस्तानी गुप्तचर संघटना भारताला व हिंदूंना टार्गेट करीत आहेत. पाकिस्तानची पहिली शिकार ही बांगलादेशातील हिंदू आहेत, त्यांच्यावर अत्याचार व हल्ले होत आहेत. बांगलादेशात सैन्याच्या मदतीने भारताच्या विरोधात मोहीम सुरू करणे हा पाकिस्तानच्या रणनितीचा दुसरा भाग असू शकतो आणि तिसरा भाग म्हणजे भारतीय बनावटीच्या वस्तूंवर व साधनसामग्रीवर बांगलादेशात बहिष्कार पुकारणे, त्यातून भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न करणे. देशात हिंदू विरोधी हिंसाचाराच्या घटना वाढल्यावर बांगलादेशाने कोलकता व त्रिपुरा येथून आपले दूतावासातील अधिकाऱ्यांना विचारविनिमय करण्यासाठी बोलावून घेतले. एवढेच नव्हे तर बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबूर रहमान यांचे बांगलादेशच्या चलनी नोटांवरून फोटो काढून टाकण्याचे फर्मान निघाले. मोहम्मद युनूस सरकारने भारताबरोबर झालेला मोबाईल इंटरनेट कनेक्टिव्हीटी समझोता रद्द केला आहे. भारताच्या ईशान्येकडील राज्यांना त्याचा फटका बसणार आहे. हा समझोता शेख हसीना सरकारने केला होता. भारताच्या ईशान्येकडील राज्यात मोबाइल इंटरनेट कनेक्टिव्हीटी चांगली नाही. रिजनल डिजिटल हबच्या माध्यमातून बांगलादेश सीमेवर इंटरनेट सर्किट स्थापन करण्यात येणार होते. त्यातून ईशान्येकडील राज्यांना डेटा ट्रान्समिशन सुविधा उपलब्ध होणार होती. हे काम भारती एअरटेलने समीट कम्युनिकेशन या बांगलादेशी कंपनीच्या मदतीने पूर्ण करायचे होते. बांगलादेश टेलिकम्युनिकेशन रेग्युलेटरी कमिशनने त्याला मंजुरीही दिली होती. पण युनूस सरकारने या कराराचा बांगलादेशला काहीही आर्थिक लाभ नाही, असे कारण देऊन करार रद्द करून टाकला. समीट कम्युनिकेशनचे चेअरमन मोहम्मद फरिद हे शेख हसीना यांच्या अवामी लीगच्या खासदारांचे धाकटे भाऊ आहेत. दोन देशांतील संबंध सुरळीत व्हावेत यासाठी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी मोहम्मद युनूस यांची ढाक्यात जाऊन भेट घेतली. शेख हसीना सत्तेवरून पायउतार झाल्यावर भारत-बांगलादेशातला हा पहिलाच संवाद होता. दि. 5 ऑगस्ट 2024ला हसीना यांच्याविरोधात मोठा उठाव झाला व त्यांना भारतात आश्रय घेणे भाग पडले. बांगलादेशात निदर्शकांनी लुटालूट-जाळपोळ व सरकारी मालमत्तांचे मोठे नुकसान केले. जनक्षोभापुढे पोलीस व सुरक्षा दलांनी शस्त्रे खाली टाकली. आज या देशात इस्लामिक कट्टरतावाद्यांकडून हिंदूंवर अत्याचार होत असताना, हिंदूंची मंदिरे व मालमत्ता यांना आगी लावल्या जात असताना पोलीस बघ्याची भूमिका घेत आहेत. हसीना व अवामी लिगचे नेते हे निदर्शकांचे टार्गेट आहे. राजकारणी, कलावंत, नोकरशहा, पत्रकार, बुद्धिमंत, सामाजिक नेते असे शेकडो जण स्वत:चा जीव वाचविण्यासाठी आर्मी कॅन्टोन्मेंटमध्ये आश्रयाला आहेत. बांगलादेशातील हिंदू हे अवामी लिग व शेख हसीनाचे समर्थक म्हणून ओळखले जातात म्हणून हसीना विरोधकांचे व कट्टरतावाद्यांचे सॉफ्ट टार्गेट हिंदू बनले आहेत. बांगलादेशच्या बांगला व इंग्रजी वृत्तपत्रांतूनही हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांची आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. भारताने चिंता व्यक्त केली, तर तो आमचा अंतर्गत मुद्दा आहे असे उत्तर युनूस सरकारने दिले आहे. हसीना यांनी भारतात पलायन केल्यावर अवामी लिगच्या हजारो नेते, पदाधिकारी यांनी देशाबाहेर जाण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना सीमेवर रोखण्यात आले. हसीना सरकारमधील अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप ठेवण्यात आले आहेत. कट्टरतावाद्यांच्या विरोधात लिहिणाऱ्या पत्रकारांनाही अटक करण्यात आली आहे. भारतीय माध्यमांनीच बांगलादेशमधील चित्र भडकपणे रंगवले असा आरोप युनूस सरकारकडून केला जात आहे.

## महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणेची जोडी एकत्र





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

काय ऐकलात का ? मराठी चित्रपटसृष्टीतील दोन सर्वात प्रतिष्ठित कलाकार आपल्या सर्वांचे आवडते म्हणजेच महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे, त्यांच्या तीन दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत प्रथमच एका आगामी मराठी चित्रपट "देवमाणूस" साठी एकत्र येत आहेत. होय वास्तव, नटसम्राट आणि मी शिवाजीराजे भोसले बोलतोय यांसारख्या चित्रपटांतील आपल्या दमदार अभिनयासाठी ओळखले जाणारे अभिनेते महेश मांजरेकर यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत स्वत:चा ठसा चांगलाच उमटवला आहे. इंटेन्स ड्रामा ने भरपूर अशा भूमिकांपासून ते पावरफुल ॲक्शन-पॅक व्यक्तिरेखा साकारत महेशजींनी मनोरंज विश्वात सर्वात प्रतिष्ठित अभिनेत्यांपैकी एक अशी आपली जागा बनवली आहे.

दुसरीकडे अभिनेत्री रेणुका शहाणे, हम आपके है कौन, अबोली, जानिवा यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या अभूतपूर्व भूमिकांमुळे प्रसिद्ध आहेत, त्यांनी आतापर्यंत साकारलेल्या प्रत्येक भूमिकाची शोभा वाडवली आहे. टीव्ही आणि चित्रपट या दोन्ही क्षेत्रात दमदार कारकीर्दीसह, त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहे.

## बजरंग दलाच्या सिंहगड रोड विभागाच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

- रक्तदान शिबिरात एकाच वेळी 2055 रक्तपिशव्या संकलित



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्व हिंदू परिषद बजरंग दल यांच्यावतीने सीमेवरील हुतात्मा जवान आणि राम जन्मभूमी आंदोलनातील हुतात्मा कारसेवक कोठारी बंधू यांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. सिंहगड रोड भागात सतरा ठिकाणी हा रक्तदान महायज्ञ पार पडला. विश्व हिंदू परिषद बजरंग दल सिंहगड रोड भाग यांच्यावतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. ह्या शिबिरास रामभक्त तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कारसेवक कोठारी बंधू यांच्या स्मरणार्थ विश्व हिंदू परिषद बजरंग दल यांच्या वतीने प्रतिवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. त्यात सिंहगड रोड विभागाने चांगली कामगिरी केली. सिंहगड रोड भागातील 17 ठिकाणी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. त्यातून 2055 रक्त पिशव्या संकलित करण्यात आले.यावेळी रक्तदान शिबिरास पुणे भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष धीरजजी घाटे, माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप, खडकवासला भाजपा अध्यक्ष सचिन मोरे,अखिल भारतीय गोरक्षा प्रमुख दिनेशजी उपाध्याय,संयुक्त केंद्रीय मंत्री श्री. दादा वेदक,क्षेत्र गोरक्षा प्रमुख श्री,भाऊराव कुदळे,क्षेत्र धार्मिक पुंज प्रमुख श्री. संजय मुरदाळे,प्रांत मंत्री किशोर चव्हाण,प्रांत विशेष संपर्क प्रमुख : श्री. अनिकेत देशमुख,प्रांत प्रचार प्रमुख : श्री. श्रीपाद रामदासी,विभाग मंत्री : श्री. केतन घोडके.,विभाग सहमंत्री : श्री. दिनेश लाड, श्री.अतुल सराफ,भाग मंत्री : श्री.साईनाथ कदम,भाग संयोजक : श्री. राजू कुडले,भाग सहसंयोजक : श्री.अमोल सावंत,भाग सहमंत्री योगेश देशपांडे, श्री. महेश चिलमे, श्री. रोहन उखरडे. आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच रक्तदान शिबिरासाठी सागर सातपुते,सचिन कांबळे,वैभव पवार,रोहित लांडगे,सुशांत नाईक,आदित्य सहस्त्रबुद्धे,अमेय गोडसे,वैभव थोपटे,श्री पवार,तिमिर निकम,शुभम कुंभारकर,चेतन घोडके,विशाल कडू,संतोष कदम,अजय निकम,अभिजित कुलकर्णी,सागर बेलसरे यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात



### शांतता..पुणेकर वाचत आहेत मोहिमेमध्ये ॲड. जगताप सहभागी!

**पुणे (आरंभ पर्व) :** "शांतता.. पुणेकर वाचत आहेत!" हा उपक्रम पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने हा वाचन चळवळीला पाठिंबा देणारा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. त्यानिमित्ताने ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने दिवाळीनिमित्त आणि वर्षातून एकदा प्रकाशित होणाऱ्या विवेक या पुस्तकाचे वाचन करत या उत्कृष्ट उपक्रमात सहभाग नोंदवला. वाचन संस्कृती ही महत्त्वाची आहे ती जपली पाहिजे असा संदेश यानिमित्त दिला जातो. माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप हे नेहमी सार्वजनिक उपक्रमांना तसेच संघ कार्याला प्रोत्साहन देत असतात.




### वैरागमध्ये ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम

**बार्शी (आरंभ पर्व) :** वैराग शहरात शहराध्यक्ष सुरज वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली वंचित बहुजन आघाडी च्या वतीने ईव्हीएम विरोधात जन आंदोलन स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली आहे. भारतीय लोकशाही वाचवण्यासाठी ईव्हीम मतदान प्रक्रिया बंद केले पाहिजे . या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभर स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडी बार्शी तालुका अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड व उपाध्यक्ष मनोहर कांबळे शहराध्यक्ष सुरज वाघमारे व वंचित बहुजन आघाडी बार्शी तालुका सहसचिव विश्वजीत साबळे ,धनंजय जगदाळे, राजरत्न डोळसे उपस्थित होते.

### केएसबी लिमिटेडच्या स्टॉल्सना किसान प्रदर्शनात उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (आरंभ पर्व) :** मोशी येथे 11 ते 15 डिसेंबर 2024 दरम्यान होणाऱ्या, किसान प्रदर्शनामध्ये केएसबी लिमिटेडने कृषी, घरगुती आणि सौर पंपांच्या प्रगत तंत्रज्ञानाची झलक सादर केली आहे. भारतातील सर्वात मोठ्या कृषी मेळ्यांपैकी एक असलेल्या या प्रदर्शनात शेतकरी व कृषी व्यवसायातील व्यावसायिकांना एकत्र आणून नवनवीन कृषी उपकरणे व तंत्रज्ञान सादर करण्यासाठी हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे.केएसबी लिमिटेड, इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीव जैन आणि महावीर एंटरप्रायझेसचे मान्यवर डीलर श्री. सचिन चांगेडिया यांनी कृषी आणि घरगुती पंप स्टॉलचे उद्घाटन केले. तसेच श्री. जैन, केएसबी इंस्टॉलर श्री. घनश्याम भुमकर आणि श्री. अक्षय चव्हाण यांनी सौर पंप स्टॉलचे उद्घाटन केले. केएसबी लिमिटेडने प्रदर्शनात दोन स्वतंत्र स्टॉल्स उभारले असून, या स्टॉल्सला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. या स्टॉलमध्ये V6 पंपचे आडवे (horizontal) डेमो प्रदर्शन मुख्य आकर्षण ठरत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे विशेष लक्ष वेधले गेले आहे. याशिवाय, 6" बोरवेल सबमर्सिबल पंपच्या यशस्वी आडव्या स्थापनेबाबत विद्यमान ग्राहकांनीही आपला अनुभव शेअर केला.

## नवले पुलावरील वाहतूक कोंडीसाठी दोडके "दिल्ली दरबारी"



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीमधील महाविकास आघाडीचे पराभूत उमेदवार सचिन दोडके यांनी थेट "दिल्ली दरबारी" खडकवासला मतदारसंघातील प्रश्न मांडले.

नवले ब्रिजवरील वाहतूक कोंडीबाबत खा. सुप्रियाताई सुळे यांच्या उपस्थितीत रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सदरील वाहतूक कोंडीबाबतच्या उपाययोजनाचा प्रस्ताव दोडके यांनी गडकरी यांच्याकडे मांडला आहे.

**"क्या हार में क्या जीत में...**

"क्या हार में क्या जीत में, दौडता रहुंगा जन हीत में "म्हणत खडकवासला मतदारसंघातील जनतेसाठी दोडकेंचे प्रयत्न पाहून आगामी काळातही ते जनतेच्या प्रश्नासाठी सक्रिय राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, ह्या महामार्गावर असणाऱ्या स्वामीनारायण मंदिर ते वारजे ओव्हर ब्रिजच्या सुमारे 3800 कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होत आहे. यामध्ये प्रामुख्याने खडकवासला नऱ्हे येथील भूमकर चौकातील सद्यस्थितीत असणारा पूल दुपटीने रुंद करण्यात यावा. तसेच नवले ब्रिज परिसरामध्ये अपघात रोखण्याकरिता अधिकच्या उपाययोजना करण्यात याव्या यासाठी निवेदन देण्यात आले.

यावेळी या निवेदनाबाबतीत आवश्यक त्या उपाययोजना केले जातील असं आश्वासन गडकरी यांनी यावेळी दिले..

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे, धैर्यशील मोहिते पाटील निलेश लंके, इतर खासदार, पुण्याचे युवा नेते विरेशभाऊ शितोळे उपस्थित होते.

जनतेचे चांगले समर्थन मला मिळाले. त्यामुळे त्यांच्यासाठी जनतेचा सेवक म्हणून मी नक्कीच काम करणार आहे. आपल्या कर्तव्यदक्ष खा. सुप्रियाताई सुळे यांच्यासोबत आगामी काळातही खडकवासला मतदारसंघातील जे प्रश्न विधानसभा निवडणुकीमध्ये मी जे प्रश्न मांडले त्यावर मीही नक्कीच पाठपुरावा करणार आहे. जनतेचे महत्वाचे प्रश्न सोडवण्याकडे माझाही भर असणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरील वाहतूक कोंडीबाबतमागील दोन-तीन वर्षांपासून आम्ही पाठपुरावा करत आहोत.आगामी काळात या रस्त्यावरील वाहतुक कोंडी दूर होईल.
- सचिन दोडके
मा. नगरसेवक

*कै. महादेव दगडु कदम यांच्या स्मरणार्थ कथाप्रवक्ता प्रियंकाताई भोसले यांचे*

## 'गरुडपुराण' कथा सप्ताह मधून विस्तृतपणे मार्गदर्शन



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

कोरेगावमुळ (ता.हवेली) येथील सिद्धनाथ इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा महादेव दगडु कदम यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. यानिमित्ताने राजगड येथील कथाप्रवक्ता प्रवचनकार कीर्तनकार ह.भ.प.प्रियांकाताई भोसले यांचे गरुड पुराण कथा सप्ताह चालू करण्यात आला होता. कदम कुटुंबातील सदस्यांच्या वतीने ठेवण्यात आला होता. यावेळी कदम परिवारातील सदस्य स्नेही भावबंध मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कथाप्रवक्ता प्रियांकाताई भोसले (राजगड) यांनी अगदी साध्या सोप्या भाषेत नागरिकांना समजेल या पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न केला. गरुडपुराणानुसार जीवणातील सर्वच दु:खापासुन तरून जायचे असेल, आणि देहावसान झाल्यानंतर ज्या भयानक यमयातना भोगायला लागणार आहे, तो खडतर प्रवास करावा लागणार आहे यापासुन मुक्त व्हायचे असेल तर आपले कर्म हाच एक मार्ग आपणाला सोडवु शकतो. व्यक्तिचे कर्म हेच सख्खे बाकी सर्व गोष्टी परक्या आहेत. कर्म सोडुन कोणीच तुमची साथ निभावणार नाही , त्यामुळे कर्माला घाबरा ( गहनाम् कर्मनाम् गती) कर्माची गती गहन आहे, भोगावेच लागते त्यामुळे दान-धर्म करा, नामस्मरण करा, परोपकार करा. शून्यातून विश्व निर्माण करण्याचं सामर्थ्य आदरणीय कै.आबाच्या मध्ये होत आज अनेकांकडे भरपूर काही आहे पण दातृत्वाची भावना कमी होत चालली आहे ती आदरणीय आबानी ती जपण्याचा प्रयत्न केला व त्याप्रकारे आपल्या मुलांच्या वर संस्कार ही करण्याचा प्रयत्न केला म्हणूनच आबाची भावी पिढी तो वारसा पुढे चालवत असल्याचे पाहून अत्यंत समाधान वाटतं आहे. अनेक उदाहरणं देऊन ते समावून सांगितले हभप प्रियांका ताई भोसले यांनी.

## थोडक्यात



### ब्रिटिश गायक पीटर आंद्रे यांनी पुन्यधाम आश्रमाला दिली भेट


पुणे (आरंभ पर्व) : पुन्यधाम आश्रमला 8 डिसेंबर 2024 रोजी प्रसिद्ध ब्रिटीश गायक आणि कलाकार पीटर आंद्रे यांचे स्वागत करण्याचा अनोखा सन्मान लाभला. दिवसाची सुरुवात भव्य स्वागताने झाली, जिथे पाहुणे, शुभचिंतक, मार्गदर्शक आणि मान्यवर त्यांना अभिवादन करण्यासाठी रांगेत उभे होते. रेड कार्पेट अंथरण्यात आला आणि शाळेच्या विद्यार्थ्यांनी त्यांना मानाचा सलाम दिला, ज्यामुळे आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पीटर आंद्रे आश्रमाच्या मनमिळाऊ आतिथ्याने आणि उष्ण स्वागताने भावूक झाले आणि त्यांनी मां कृष्णा कश्यप, अध्यक्षा, विश्वस्त, हितचिंतक तसेच आश्रमातील सर्व सदस्यांचे कौतुक केले. आपल्या भेटीदरम्यान, त्यांनी आश्रमातील विविध भाग, सिद्धेश्वर शिखर, शिवमंदिर, साई मंदिर, डायलिसिस केंद्र, आश्रम परिसर, गोधन गोशाळा आणि इतर भाग पाहिले. भावनिक क्षण म्हणून, त्यांनी शिवमंदिराच्या परिसरात एक झाड लावले आणि स्नेह छाया शाळा आणि सैनिक शाळेच्या मुलांना भेटवस्तू वाटप केल्या. त्यांना स्वयंपाकघरातील कर्मचाऱ्यांचे तसेच त्यांना दिलेल्या स्वादिष्ट भारतीय जेवणाचे भरभरून कौतुक वाटले, आणि त्यांनी अन्नाचा मनमुराद आस्वाद घेतला. "पीटर आंद्रे यांची भेट हा खरंच एक विशेष प्रसंग होता, जो आश्रमाच्या इतिहासात कायम लक्षात राहील. त्यांच्या उपस्थितीने आणि साजऱ्या उत्सवांनी हा दिवस अविस्मरणीय बनवला," मां आनंदाने म्हणाल्या.

### आलिया आणि कियारा मोठा बदल घडवण्यासाठी सज्ज!



पुणे (आरंभ पर्व) : भारतीय सिनेमातील दोन ताकदीच्या अभिनेत्री, आलिया भट्ट आणि कियारा आडवाणी, 2025 मध्ये "अल्फा" आणि "वॉर 2" च्या माध्यमातून स्पाय युनिव्हर्सला नवा आयाम देण्यासाठी सज्ज झाले आहेत. दोघींनीही आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात विशेष जागा निर्माण केली असून, आता त्या या जगात सशक्त महिला भूमिकांना नवी परिभाषा देणार आहेत. "अल्फा" या चित्रपटात आलिया भट्टची भूमिका हे या युनिव्हर्ससाठी एक रोमांचक पाऊल ठरणार आहे. तिच्या उत्कृष्ट अभिनय कौशल्यामुळे ती जासूसी आणि ॲक्शनच्या नव्या जॉनरमध्ये स्वतःला पुन्हा सिद्ध करणार आहे. आलियाने नेहमीच आपल्या पात्रांमध्ये ताकद दाखवली आहे, ज्यामुळे तिच्या "अल्फा" मधील भूमिकेबाबत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. कियारा आडवाणीचं या युनिव्हर्समध्ये येणं ही सध्याच्या काळातील सर्वात मोठी कास्टिंग अनाऊंसमेंट आहे. कियारा या स्पाय ॲक्शन थ्रिलरमध्ये जबरदस्त स्टंट्स सीन्स मध्ये दिसणार आहे. याबाबत चाहत्यांमध्ये आधीपासूनच चर्चा होत आहे की कियाराची एनर्जी आणि अभिनयाची शैली "वॉर 2" मधील तिच्या भूमिकेत प्रेक्षकांचं दिलखुलास मनोरंजन करणार आहे. आलिया भट्ट आणि कियारा आडवाणी यांच्यासारख्या दोन दमदार अभिनेत्रींच्या येण्याने स्पाय युनिव्हर्सचं आकर्षण आणखीनच वाढलं आहे, यात शंका नाही. त्यांच्या अभिनयातून या युनिव्हर्समध्ये नव्या गोष्टी अनुभवायला मिळतील, आणि 2025 हे वर्ष बॉलिवूडसाठी स्पाय थ्रिलर्ससाठी नक्कीच ऐतिहासिक ठरणार आहे.

# आशुतोष गोवारीकर प्रोडक्शन्सने पूर्ण केले स्टोरीटेलिंगचे 20 वर्ष



मुंबई (दै. आरंभ पर्व) आशुतोष गोवारीकर प्रोडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड (AGPPL) ने आज एक उल्लेखनिय बाब साधली आहे. AGPPL ने भारतीय मनोरंजनसृष्टीत दोन दशके पूर्ण केली असून, आज त्यांनी 20 वर्षांचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. फिल्मकेकर आशुतोष गोवारीकर आणि त्यांच्या पत्नी सुनीता गोवारीकर यांनी 2004 मध्ये AGPPL ची स्थापना केली होती, आणि याचं पहिले प्रोजेक्ट 'स्वदेश' हा चित्रपट होता जो घर आणि मानवतेला समर्पित आहे. या दोन दशकांमध्ये, AGPPL ने अनेक समीक्षकांच्या प्रशंसेला पात्र ठरून यशस्वी चित्रपट निर्माण केले आहेत, ज्यामध्ये जोधा अकबर, खेलें हम जी जान से, मोहनजो दाड़ो आणि पानीपत यांचा समावेश आहे. या खास प्रसंगी, AGPPL ने एक विशेष ट्रेलर प्रदर्शित केला, जो त्यांचा 20 वर्षांचा यशस्वी प्रवास दाखवतो. या ट्रेलरमध्ये प्रोडक्शन हाऊसच्या ऐतिहासिक चित्रपटांची झलक दाखवण्यात आली आहे ज्यामधून, कला, भव्यता आणि भावना, म्हणजेच एकंदरीत आशुतोष गोवारीकर यांचे सिनेमॅटिक व्हिजन दिसून येते. या विशेष दिवसाच्या निमित्ताने निर्मात्या सुनीता गोवारीकर म्हणाल्या, "AGPPL, माझं तिसरं बाळ आहे, जे 2004 मध्ये जन्मले आणि आज ते 20 वर्षांचं झालं आहे. कठोर मेहनत, चांगल्या आणि वाईट काळात या स्वप्नाला प्रत्यक्षात आणण्याचा प्रवास एक रोलरकोस्टर सारखा होता आणि मी त्या प्रत्येक क्षणाचा आनंद घेतला आहे. मागे वळून पाहताना, मला खूप अभिमान वाटतो. हे 20 वर्ष सहकार्य, क्रिएटिव्हिटी आणि अनोख्या समर्पणाची असाधारण जर्नी होती आणि आम्ही भविष्यात आणखी नवे प्रोजेक्ट करण्यासाठी उत्साही आहोत." या प्रवासाविषयी व्यक्त होताना आशुतोष गोवारीकर म्हणाले की, "सुनीता आणि मी AGPPL ची सुरूवात एका स्वप्नाने केली होती, की त्याच गोष्टी मांडायच्या ज्या मनाला भिडतील आणि प्रेरित करतील. या कंपनीच्या माध्यमातून मला अनेक प्रतिभावान लोकांना भेटण्याचं आणि त्यांच्याशी सहकार्य करण्याचं भाग्य लाभलं, ज्यामुळे हा प्रवास अद्भुत बनला. 20 वर्षांचा हा टप्पा अभिमान आणि कृतज्ञतेचा क्षण आहे. हे सर्वकाही कलाकार, टेक्निशियन आणि क्रू सदस्यांच्या योगदानामुळे शक्य झालं आहे. त्यांचे मी मनापासून आभार मानतो आणि आमच्या माय बाप रसिक प्रेक्षकांनी आम्हाला जे प्रेम दिलं त्यासाठी त्यांचे आभार व्यक्त करतो." AGPPL प्रोडक्शन हाऊस मनोरंजन, शिक्षण आणि प्रेरणा देणाऱ्या चित्रपटांच्या निर्मितीसाठी प्रतिबद्ध आहे. आशुतोष गोवारीकर प्रोडक्शन्सची पहिली फीचर फिल्म 'स्वदेश' (2004) होती, आणि त्यानंतर आशुतोष गोवारीकर आणि सुनीता गोवारीकर यांनी आपले स्वतःचे फिल्म प्रोडक्शन हाऊस AGPPL स्थापन केले. स्क्रीन, टेलीव्हिजन, म्युझिक आणि OTT सर्व प्लॅटफॉर्मवर कंटेंट निर्माण करण्यासाठी AGPPL ने UTV, Disney, PVR, Star Plus आणि T-Series यासारख्या प्रमुख इंडस्ट्री टॅलेंट आणि स्टुडिओसह कोलॅबरेशन केलं. AGPPL ने नेहमीच आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून राष्ट्रवाद, देशभक्ती, धार्मिक सहिष्णुता, जाती व्यवस्था, महिला सशक्तीकरण, मुलींचे संरक्षण यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण सामाजिक मुद्द्यांवर प्रकाश टाकला आहे, ज्याला भारत आजही तोंड देत आहे. AGPPL चित्रपटांना भारतात राष्ट्रीय पुरस्कारांसह भारतीय आणि आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये देखील अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

# शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध : बाबाजी काळे




● राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमात बोलताना आमदार बाबाजी काळे व इतर मान्यवर. (छायाचित्र : किरण खुडे , राजगुरूनगर) ●



राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व) खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने खेड तालुक्याच्या ग्रामीण व आदिवासी भागातील हजारो विद्यार्थ्यांना हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या माध्यमातून शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांना यशस्वी जीवन जगण्याची संधी मिळाल्याचे प्रतिपादन आमदार बाबाजी काळे यांनी केले. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित जाहीर सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

या प्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, शांताराम घुमटकर, डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सर्व संचालक तसेच ॲड. पोपटराव तांबे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, ज्योती अरगडे, डॉ. शैलेष मोहिते उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे पुढे म्हणाले की परिवर्तनाची गरज ओळखून तालुक्याने संधी दिली. जनता हीच माझी संपत्ती असून आमदारकीचा वापर समाजासाठी करणार आहे. खेड तालुका औद्योगिकदृष्ट्या प्रगत असला तरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. त्यामुळे तरुणांच्या रोजगार निर्मितीसाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे ते म्हणाले. तालुक्यातील कंपन्यांच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातून शैक्षणिक संस्थांना मदत करणार असून शिक्षण, आरोग्य व पाणी यासाठी या कंपन्यांचा निधी मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे. विद्यार्थ्यांनी अपयशाने खचून न जाता प्रामाणिकपणे प्रयत्न करावे, आई-वडिलांचा मान राखावा आणि आपले करियर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी संस्थेच्या 50 वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. आमदार बाबाजी काळे यांचे अभिनंदन करताना तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना कंपन्यांमधील सीएसआर फंडांच्या माध्यमातून मदतीची मागणी केली.

माजी कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक जंगल खेंगले, शांताराम घुमटकर, मारूतराव बारणे, साहेबराव देशमुख, डॉ. अनिल खिंवसरा, तुकाराम वहिले, रघुनाथ दौंडकर, रामचंद्र मोहिते यांचा सत्कार करण्यात आला. आचार्य नागार्जुन विद्यापीठ गुंटूर येथे आयोजित करण्यात आलेल्या दक्षिण - पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये 102 कि.लो. वजनी गटात सुवर्णपदक संपादित केलेल्या वैष्णव ठाकूर याचा विशेष सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी मानले.

# मनोरंजनाची संगीतमय सफर घडवणारा 'श्री गणेशा' 20 डिसेंबरला होणार प्रदर्शित




पुणे (दै. आरंभ पर्व) कोणत्याही नवीन गोष्टीची सुरुवात 'श्री गणेशा' म्हणून केली जाते. सध्या रसिकांमध्येही अशाच एका 'श्री गणेशा'ची जोरदार चर्चा आहे. 'श्री गणेशा' हा एक आगामी मराठी चित्रपट प्रेक्षकांना मनोरंजनाच्या अनोख्या सफरीवर नेणार आहे. मराठी फॅमिली एन्टरटेनर असलेला 'श्री गणेशा' हा मराठीतील एक धमाल रोड मुव्ही आहे. या चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस उतरली असून, ट्रेलरलाही तूफान प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या चित्रपटात नेमके काय पाहायला मिळणार याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. हा चित्रपट 20 डिसेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'श्री गणेशा' धमाल रोड ट्रीपचा आणि 'श्री गणेशा' फॅमिली एंटरटेनमेंटचा' असे म्हणत खऱ्या अर्थाने रोड ट्रीपच्या रोलर कोस्टर राईडवर नेणाऱ्या 'श्री गणेशा' या फॅमिली एंटरटेनमेंटची प्रस्तुती एमएच-12 सिने मीडियाने आऊट ऑफ द बॉक्स फिल्म्सच्या सहयोगाने केली आहे. संजय माणिक भोसले आणि कांचन संजय भोसले या चित्रपटाचे निर्माते, तर रवि माणिक भोसले आणि महेश माणिक भोसले या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. आजवर नेहमीच आशयघन चित्रपटांना विनोदाची किनार जोडत परिपूर्ण मनोरंजनाद्वारे जनमानसापर्यंत मोलाचा संदेश पोहोचवणारे दिग्दर्शक मिलिंद कवडे 'श्री गणेशा'च्या निमित्ताने लाफ्टर आणि मॅडनेसचा डबल धमाका करणार आहेत. चित्रपटाची घोषणा झाल्यापासून हा चित्रपट कायम चर्चेत आहे. मिलिंद कवडे आणि प्रथमेश परब ही दिग्दर्शक-अभिनेत्याची सुपरहिट जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकत्र आली आहे. त्यामुळे हा चित्रपट म्हणजे मौज, मस्ती आणि धमाल अशी रोलर कोस्टर राईडच ठरणार आहे. प्रथमेशने यापूर्वी साकारलेल्या दगडू आणि टकाटक मधील गण्या नंतर या चित्रपटात त्याच्या रूपातील टिकल्याची कमाल पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात प्रथमेशसोबत मेघा शिंदे ही नवीन नायिका असल्याने नव्या जोडीची केमिस्ट्रीही प्रेक्षकांना आकर्षित करणार आहे. प्रथमेशच्या सोबतीला शशांक शेंडे हे कोणत्याही भूमिकेला न्याय देण्यास सक्षम असलेले अभिनेते आहेत. त्यांनी यात चक्क दाढी-मिशी चकाचक करून भाऊसाहेब पाटील हे कॅरेक्टर साकारले आहे. भाई वेंगुर्लेकरच्या रूपात संजय नार्वेकर पुन्हा एकदा प्रेक्षकांवर मोहिनी घालण्यासाठी सज्ज आहे. या चित्रपटातील गाणी अगोदरच लोकप्रिय झाली आहेत. 'आली मधुबाला...' हे गाणे चांगलेच पॉप्युलर झाले असून, टायटल ट्रॅकही संगीतप्रेमींच्या पसंतीस उतरत आहे. हा एक रोड मुव्ही असल्याने यातील कमालीची नेत्रसुखद लोकेशन्स प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणार आहेत. या चित्रपटाबाबत मिलिंद कवडे म्हणाले की, 'श्री गणेशा'च्या रूपात आम्ही आजवर मराठीत कधीही न सादर केलेले कथानक रोड मुव्हीच्या माध्यमातून आणले आहे. यात केवळ विनोद नसून, इमोशन्सही आहेत. यातील नातेसंबंधांची गोष्ट प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आहे. यासाठी प्रत्येक कलाकाराने आपले शंभर टक्के योगदान दिले आहे. प्रथमेश आणि शेंडे यांच्यातील अफलातून टायमिंग प्रेक्षकांना चित्रपट पाहताना अनुभवायला मिळेल. संजय नार्वेकरने आपल्या नेहमीच्या शैलीत केलेली फटकेबाजी आणि नाट्यमय वळणांची पटकथा शेवटपर्यंत खिळवून ठेवेल. 'श्री गणेशा'च्या माध्यमातून आपल्या टिमने एक परिपूर्ण कौटुंबिक मनोरंजक चित्रपट रसिकांसमोर सादर केला असल्याचेही कवडे म्हणाले. दिग्दर्शनासोबत चित्रपटाची कथासुद्धा मिलिंद कवडे यांनीच लिहिली आहे. याखेरीज त्यांनी संजय नवगिरे यांच्या सोबत मिळून पटकथालेखनही केले आहे. संजय नवगिरे यांनी संवादलेखन केले आहे. गीतकार जय अत्रे आणि मंदार चोळकर यांनी गीतलेखन केले असून, संगीतकार वरुण लिखते यांनी त्यावर स्वरसाज चढवला आहे. पार्श्वसंगीत अभिनय जगताप यांनी दिले आहे. डीओपी हजरत शेख वली यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, गुरु पाटील यांनी संकलन केले आहे. राहुल ठोंबरे यांनी नृत्य दिग्दर्शन, तर सुमित पाटील कला दिग्दर्शन केले आहे. दिपक एस. कुदळे (पाटील) या चित्रपटाचे कार्यकारी निर्माता, तर विनोद शिंदे सहदिग्दर्शक आहेत.

# 'फ्लिपकार्ट २०२४' पुरस्कार सोहळ्यात फ्लिपकार्टकडून विक्रेत्यांचा सन्मान



फ्लिपकार्टच्या होम आणि ग्रोसरी बिझनेसचे बीजीएम, एसव्हीपी अँड हेड ऑफ मार्केटप्लेस श्री. साकेत चौधरी या प्रसंगी म्हणाले, की 'फ्लिपकार्ट अवॉर्ड्स हा उत्कृष्टता, लवचिकता आणि उद्योजकतेच्या परिवर्तनीय शक्तीचा उत्सव आहे. देशभरात ई-कॉमर्स सेवा सुलभ करण्याच्या फ्लिपकार्टच्या उद्दिष्टामागे आमचे विक्रेते ही आमची प्रेरणा आहे. या कार्यक्रमातून ग्राहकांचे समाधान करण्यासाठी आणि व्यवसायातील क्लपकतेसाठी त्यांनी दिलेले उल्लेखनीय योगदान अधोरेखित होते. फ्लिफ्लिपकार्टमध्ये आम्ही विक्रेत्यांना अत्याधुनिक साधने, प्रगतिशील धोरणे आणि ऑनलाइन व्यवसाय सातत्यपूर्ण आणि लाभदायक बनवण्यासाठी अतुलनीय समर्थन देण्याच्या आमच्या बांधिलकीवर ठाम आहोत. कल्पकतेला आणि सहयोगाला मूर्त रूप देणाऱ्या सर्व विजेत्यांचे व सहभागींचे अभिनंदन. आम्ही एकत्रितपणे ई-कॉमर्सचे भविष्य घडवित आहोत आणि देशभरातील लाखो लोकांना सेवा देणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वाढीस हातभार लावत आहेत.'

जयपूर (दै. आरंभ पर्व) फ्लिपकार्ट या भारतीय ई-कॉमर्स व्यासपीठाने जयपूर येथील लीला पॅलेस येथे आयोजिलेल्या प्रतिष्ठित 'फ्लिपकार्ट 2024' पुरस्कार सोहळ्यात आपल्या 14 लाख विक्रेत्यांच्या कामगिरीचा जल्लोष साजरा केला. या प्रतिष्ठित सोहळ्याचे यजमानपद सुनील ग्रोव्हर यांनी भूषवले; तसेच सेलिब्रिटी गायिका शाल्मली खोलगडे यांचा दिलखेचक कार्यक्रम या वेळी झाला. फ्लिपकार्टच्या विक्रेत्यांची लवचिकता, कल्पकता आणि उद्योजकतेचा सन्मान करण्यासाठी फ्लिपकार्टच्या होम आणि ग्रोसरी बिझनेसचे बीजीएम, एसव्हीपी अँड हेड ऑफ मार्केटप्लेस श्री. साकेत चौधरी अन्य अधिकाऱ्यांसमवेत उपस्थित होते.

ग्राहकांचे समाधान करण्यात आणि उद्योगाच्या वाढीमध्ये योगदान देणाऱ्या फ्लिपकार्टच्या विक्रेत्यांच्या व सहयोगींच्या उत्कृष्ट कामगिरीची पोचपावती म्हणून फ्लिपकार्ट अवॉर्ड्स हा उत्सव दरवर्षी साजरा करण्यात येतो. चालू वर्षीच्या म्हणजे 2024 च्या या उत्सवात बीजीएम, इलेक्ट्रॉनिक्स, होम, फॅशन, जीवनशैली, फर्निचर व उपकरणे यांसारख्या प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावण्यावर प्रकाश टाकण्यात आला. मेट्रो आणि टियर 2 व टियर 3 शहरांमधील प्रमुख मेट्रिक्सच्या आधारे विक्रेत्यांचे मूल्यांकन करण्यात आले.

'बिग बिलियन डेज' सेलच्या कार्यक्रमापूर्वी फ्लिपकार्टने देशभरात विक्रेत्यांचे मेळावे घेतले. त्यामध्ये सूरत, मुंबई, दिल्ली, लुधियाना, त्रिपूर, जयपूर, आग्रा, बेंगळुरु आणि हैदराबाद या शहरांचा समावेश होते. फ्लिपकार्टच्या 14 लाखांपेक्षाही अधिक उद्योजकांना आणि विक्रेत्यांना उद्योगवाढीसाठी सक्षम करणे हा यामागचा उद्देश होता. सणासुदीच्या दिवसांमध्ये भरपूर व्यवसाय करण्यासाठी ग्राहकांची मागणी, खरेदीचा कल आणि वाढीचे धोरण यांबाबत बहुमूल्य मार्गदर्शन करण्यासाठी साधने आणि ज्ञान देण्याच्या दृष्टीने या मेळाव्यांनी मोठी भूमिका बजावली. याचा लाभ घेऊन अनेक विक्रेत्यांनी सणासुदीच्या दिवसांमध्ये आधीच्या तुलनेत आपल्या व्यवसायात 40 ते 50 टक्के वाढ नोंदवली. 'फ्लिपस्टार्स 2024' या कार्यक्रमात 'भारताची ई-कॉमर्स ओळख निर्माण करणे : उद्योजकांना सशक्त बनवणे आणि जागतिक संवादाला चालना देणे ' या विषयावर एक वैशिष्ट्यपूर्ण चर्चा घेण्यात आली. त्यामध्ये विक्रेत्यांना कल्पकता आणि सहयोगाविषयीची दृष्टी देण्यात आली. या सत्रात फ्लिपकार्टचे वरिष्ठ संचालक यतीश भार्गव, सहसंस्थापक आणि सीईओ भरत कालिया, लाइफलाँग ऑनलाइन आणि श्याम उन्नीकृष्णन (भागीदार, बेन अँड कंपनी) यांनी सहभाग घेतला होता. त्याचप्रमाणे, फ्लिपकार्टचे हेड ऑफ शॉप्सी कपिल थिरानी आणि मार्ट (एमएआरटी)च्या प्रॉडक्ट अँड टेकचे व्हीपी दिव्येश शहा यांनी फ्लिपकार्टच्य् 2025 साठीच्या धोरणात्मक दृष्टिकोनासंबंधीची माहिती देऊन महत्त्वाच्या विषयांवर विक्रेत्यांना मार्गदर्शन केले.

फरिदाबाद येथील एसपी हाऊसचे हेमंत कुमार यांनी या उत्सवात मिळालेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

ते म्हणाले, 'आदरणीय पाहुण्यांच्या उपस्थितीत फ्लिपस्टार 2024 हा सन्मान दिल्याबद्दल मला खरोखरच खूप आनंद होत आहे.

देशभरातील लाखो ग्राहकांना सेवा देताना समाधान वाटत आहे आणि प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचण्याचे माझे ध्येय प्रत्यक्षात येत असल्याचा आनंद वाटत आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी फ्लिपकार्टने केलेल्या मदतीबद्दल मी आभारी आहे.

माझ्या संपूर्ण प्रवासात फ्लिपकार्टने मला केलेले अतूट समर्थन आणि विश्वास माझ्या व्यवसायाला नव्या उंचीवर नेण्यात महत्त्वपूर्ण ठरला आहे. या ओळखीने माझा सन्मान झाला आहे आणि यामुळे अधिकाधिक विक्रेत्यांना ऑनलाइन व्यवसाय करण्याची संधी मिळेल, अशी मला आशा आहे.'

## थोडक्यात



### अलायन्स इन्शुरन्स ब्रोकर्सचा पुण्यात नवीन कार्यालयासह विस्तार

**पुणे (आरंभ पर्व) :** अलायन्स इन्शुरन्स ब्रोकर्स प्रा.लि.ने पुण्यात आपल्या व्यवसायाचा विस्तार केला असून नवीन कार्यालय सुरू केले आहे. याप्रसंगी कंपनीचे सहसंस्थापक व संचालक अतुर ठक्कर,सीएसजीचे संचालक जी.एन.साथपती,प्लेसमेंट ॲन्ड अंडररायटिंगचे संचालक प्रांतिक मित्रा,क्षेत्रीय संचालक व हेड ऑफ इमर्जिंग मार्केट सीएसजी बाप्पादित रॉय व अलायन्स इन्शुरन्स ब्रोकर्सच्या मुख्य कार्यालयातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या नवीन केंद्राद्वारे प्रॉपर्टी,मरिन,लायब्लिटी आणि आरोग्य विम्यासारखी पारंपरिक विमा उत्पादने अलायन्स तर्फे प्रदान केली जातील.त्याशिवाय पुणे व नाशिक,छत्रपती संभाजीनगर,कोल्हापूर,फलटण इत्यादी आसपासच्या औद्योगिक शहरातील ग्राहक आणि व्यावसायिक संस्थांसाठी ओपीडी आणि ॲफिनिटी इन्शुरन्स,श्युरिटी बाँडस यासारखे नवीन काळातील व अभिनव उत्पादने प्रदान केली जातील.भविष्यात विस्तारासाठी आणखी विमा उत्पादने प्रदान केली जातील.सध्या पुण्यातील कार्यालयामध्ये 25 लोकं कार्यरत असून पुढील वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला आणखी विस्तार होईल.कोरेगाव पार्क ॲनेक्स येथील मोठ्या कार्यालयातील विस्ताराचे उद्दिष्ट हे मोठ्या कंपन्यांशी नाते अधिक दृढ करणे हे आहे.




### अलायन्स इन्शुरन्स ब्रोकर्सचा पुण्यात नवीन कार्यालयासह विस्तार

**पुणे (आरंभ पर्व) :** उषा इंटरनॅशनल या भारतातील ग्राहकोपयोगी वस्तू उद्योगामधील आघाडीच्या कंपनीने स्वतंत्र वीर सावरकर भवन, निगडी येथे महाराष्ट्रातील उषा मर्दानी खेळ राज्य-स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी तुळजा भवानी मर्दानी खेळ प्रशिक्षण व सांस्कृतिक सेवा संस्था, पिंपरी सोबत सहयोग केला. या इव्हेण्टमध्ये 12 समूहांमधील 125 हून अधिक मार्शल आर्टिस्ट्सनी जुना पारंपारिक मार्शल आर्ट 'मर्दानी खेळासोबत महाराष्ट्रातील समृद्ध संस्कृतीला दाखवले. या कार्यक्रमाचे उद्घाटन गुणवंत सेवेसाठी राष्ट्रपती पदक विजेते आणि मर्लिन पुरस्कार जिंकणारे पहिले पोलीस कर्मचारी सुभाष दगडखैर आणि तुळजाभवानी मर्दानी खेल शिक्षण व्ही सांस्कृतिक सेवा संस्था, पुणे यांचे संचालक श्री नितीन दादा लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी श्री शिवाजी स्मारक मंडळ, महाराष्ट्राचे सदस्य सुधीर थोरात, इतिहास प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष रवींद्र पाटील, लोणावळा येथील उद्योगपती सुरेश तापकीर डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व विभागाचे नीलेश जाधव आणि तानाजी मालुसरे यांचे वंशज श्री कुणालजी मालुसरे सह अन्यमान्यवर उपस्थित होते तसेच त्यांनी बक्षीस वितरण समारोहाचे अध्यक्षस्थान देखील भूषवले. विजेते व उपविजेत्यांना शील्ड्स (ढाल) आणि पदकांसह सन्मानित करण्यात आले, तर सर्व सहभागींना परंपरा कायम ठेवण्यासाठी त्यांच्या योगदानाकरिता प्रमाणपत्रे देण्यात आली. अधिक उत्साहाची भर करण्यासाठी लकी ड्रॉचे देखील आयोजन करण्यात आले, जेथे विजेत्याला उषाकडून स्पेशल गिफ्टसह गौरविण्यात आले. सर्वसमावेशकता व संस्कृती जपत महिला व पुरूषांनी अनुक्रमे त्यांच्या पारंपारिक नऊवारी साड्या आणि मांडचोल अंगरखा परिधान केला, तसेच विविध प्रकारच्या शस्त्रांचा वापर करत आक्षेपार्ह व बचावात्मक लढाऊ कौशल्यांमधील प्रभुत्व देखील दाखवले.

# भारताची रोजगार क्षमता सात टक्क्यांनी वाढेल

## देश 2030 पर्यंत कुशल प्रतिभेसाठी जागतिक महासत्ता म्हणून उदयास येईल.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

Wheebox ETS India kills Report-2025 ने CII, TAG, AICTE आणि AIU यांच्या सहकार्याने "ग्लोबल टॅलेंट मोबिलिटी" साठी धोरणात्मक दृष्टीकोन उघड केला आहे. हे जागतिक कामगारांची मागणी, वाढत्या रोजगार क्षमतेसाठी आवश्यक कौशल्ये, भरतीचा आशावादी हेतू आणि 2030 पर्यंतचा रोडमॅप पूर्ण करण्यात भारताची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते.

भारतीय पदवीधरांमधील रोजगार क्षमतेत या वर्षी सात टक्क्यांनी स्थिर वाढ झाली आहे, जी गेल्या वर्षी 51.25 टक्क्यांवरून 2025 मध्ये 54.81 टक्क्यांवर गेली आहे. 35 वर्षांखालील भारतीय कर्मचाऱ्यांपैकी 65 टक्के लोकसंख्येसह भारतातील तरुण आणि गतिमान टॅलेंट पूल आखाती देश, विशेषतः दक्षिण-पूर्व आशिया, युरोप आणि आफ्रिकेतील उद्योगांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी तयार आहे. भारतातील कुशल व्यावसायिक,




विशेषत: तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, अक्षय ऊर्जा आणि एआय या क्षेत्रांतील कुशल व्यावसायिक जागतिक नावीन्य आणि आर्थिक विकासाला चालना देत आहेत, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. इंडिया स्किल्स रिपोर्टचे मुख्य संयोजक आणि ईटीएस कंपनी व्हीबॉक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) निर्मल सिंग म्हणाले, "हे दशक जागतिक प्रतिभा मोबिलिटीमध्ये भारताचे आहे आंतरराष्ट्रीय गतिशीलतेसाठी एक मोठा फरक पडेल "कौशल्यातील अंतर भरून काढणे, वेगाने वाढणाऱ्या जागतिक अर्थव्यवस्थेत परिवर्तनाच्या संधी निर्माण करणे."

तंत्रज्ञान, उत्पादन, आरोग्यसेवा आणि ई-कॉमर्स क्षेत्रातील कंपन्यांनी नवीन प्रतिभेची तयारी करत असताना, नोकरभरतीची आवड वाढल्याचे अहवालात दिसून आले आहे. 2025 साठी इंडिया हायरिंग इंटेंट सर्व्हे 15 उद्योगांमध्ये पसरलेल्या 1,000 हून अधिक कॉर्पोरेशनमध्ये आशावाद दर्शवितो, विशेषत: प्रवेश-स्तरीय भूमिकांसाठी. महाराष्ट्र, कर्नाटक आणि दिल्ली सारखी प्रमुख राज्ये आघाडीवर आहेत, तर पुणे, बेंगळुरु आणि मुंबई सारखी शहरे रोजगारक्षम प्रतिभेचे केंद्र म्हणून उदयास आली आहेत.

या वर्षी सात टक्क्यांच्या सतत वाढीसह, रोजगार क्षमता गेल्या वर्षीच्या 51.25 टक्क्यांवरून 2025 मध्ये 54.81 टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. हे केंद्र आणि राज्य सरकार, AICTE, UGC, AIU सारख्या संस्था आणि सुधारणा आणि सरकारी कौशल्य आणि शैक्षणिक संस्था जसे की स्किल इंडिया मिशन आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP)-2020 च्या पुढाकारांचे यश प्रतिबिंबित करते, जे व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योग-केंद्रित प्रदान करते. शिक्षणाचा आग्रह धरूया. 2025 पर्यंत 50 टक्के माध्यमिक आणि तृतीय श्रेणीतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण मिळण्याचा अंदाज असून, भारत जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कार्यशक्तीचा टप्पा तयार करत आहे.

सिंग म्हणाले, "रोजगारातील ही वाढ ही केवळ आकडेवारी नाही. परस्परांशी जुळवून घेण्याची, नवनवीनता आणण्याची आणि भरभराट करण्याच्या भारताच्या क्षमतेचा हा एक पुरावा आहे. सरकारांना आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वीकारण्याची गरज निर्माण करण्याची आवश्यकता आहे आणि "प्रमाणित कौशल्ये आणि रोजगार उपक्रम सुरू करणे आवश्यक आहे."

इंडिया स्किल्स रिपोर्ट-2025 भारताच्या टॅलेंट इकोसिस्टमला जागतिक बाजाराच्या मागणीनुसार संरेखित करण्यासाठी स्पष्ट रोडमॅपची रूपरेषा देते.

- **व्यावसायिक प्रशिक्षण:** एआय, सायबर सुरक्षा आणि हरित ऊर्जा यासारख्या उच्च-मागणी कौशल्यांवर लक्ष केंद्रित करून, राज्यांमध्ये उद्योग-विशिष्ट प्रशिक्षणासाठी प्रवेशाचा विस्तार करणे.
- **सीमापार सहकार्य:** वृद्ध लोकसंख्या आणि कौशल्याच्या कमतरतेचा सामना करणाऱ्या देशांसोबत भागीदारी मजबूत करणे.
- **तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण:** आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि शिक्षण आणि मूल्यांकनामध्ये ऑटोमेशनचा फायदा घेऊन भविष्यातील भूमिकांसाठी पदवीधरांना तयार करणे.
- **विविधता आणि समावेश:** संतुलित कार्यशक्तीला चालना देणे, ज्यामध्ये आता रोजगारक्षम प्रतिभा संचामध्ये महिलांचा वाटा ४७.५३ टक्के आहे.




# भारत व कोरियामध्ये बौद्धिक, शैक्षणिक आदानप्रदान होण्यास मदत

*प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे मत; सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स व कॉंगवून विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने बौद्धिक व शैक्षणिक देवाणघेवाणीसाठी कोरियातील कॉंगवून विद्यापीठाशी सामंजस्य करार केला आहे. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमध्ये कॉंगवून विद्यापीठाच्या टीमने नुकतीच भेट देऊन या सामंजस्य कराराचे आदानप्रदान केले. इलेक्ट्रिकल अँड बायोलॉजिकल फिजिक्सचे प्रा. नागेंद्र कुमार कौशिक व इंटरनॅशनल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संचालक सुंगवू बेंझामिन चो यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

मिस टिना चो, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, स्ट्रॅटेजिक डिजिटल ॲडवायझर सिद्धांत चोरडिया आदी उपस्थित होते. या सामंजस्य कराराने कॉंगवून विद्यापीठ व सूर्यदत्त ग्रुप यांच्यातील शैक्षणिक आणि संशोधन उपक्रमांमध्ये सहकार्याला चालना मिळणार आहे. क्षमता निर्माण, विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधन सहकाऱ्यांचे आदानप्रदान, संयुक्त संशोधन प्रकल्प व परिषदांचे आयोजन आणि शैक्षणिक विकासासाठी योगदान देणाऱ्या इतर उपक्रमांचा समावेश यामध्ये असणार आहे.

दक्षिण कोरियातील सेऊलमध्ये असलेले कॉंगवून विद्यापीठ हे अभियांत्रिकीसह माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन, सॉफ्टवेअर व कम्प्युटर इंजिनीअरिंग, आर्किटेक्चरल इंजिनिअरिंग, केमिकल इंजिनिअरिंग, एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरिंग, आदी शाखांच्या शिक्षणासाठी एक नामांकित शिक्षणसंस्था आहे. वायरलेस कम्युनिकेशन आणिइलेक्ट्रॉनिक्स एज्युकेशनमध्ये अग्रणी कॉंगवून विद्यापीठात व्यवसाय, आंतरराष्ट्रीय व्यापार, गणित, रसायनशास्त्र, क्रीडा, कोरियन भाषा व संस्कृती, कायदा आणि औद्योगिक मानसशास्त्र आदी अभ्यासक्रम प्रदान केले जातात.

# 3ए कंपोझिट्सच्या फ्लॅगशिप ब्रॅंड अल्युकोबॉन्डचे 'अलुकोड्युअल' हे प्रीमियम उत्पादन सादर

*या नाविन्यपूर्ण आणि 'मेड इन इंडिया' इंजिनियर्ड सॉलिड शीट्समुळे कंपनीच्या उत्पादन पोर्टफोलिओला मजबूती*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उच्च दर्जाच्या ॲल्युमिनियम कंपोझिट्स सामग्रीचे अग्रगण्य व जागतिक उत्पादक असलेल्या स्वित्झर्लंडस्थित 3ए कंपोझिट्सचा प्रमुख ब्रॅंड अलुकोबॉन्डने तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट, आधुनिक अशा क्लॅडिंग सोल्यूशन्सच्या प्रमुख पोर्टफोलिओला चालना देण्यासाठी 'अलुकोड्युअल' नावाचे नाविन्यपूर्ण उत्पादन सादर केले आहे. 'अलुकोड्युअल' हे कंपनीकडून विविध आर्किटेक्चरल रचना व वैशिष्ट्यपूर्ण उपयोगांसाठी बनविलेले उत्पादन आहे. पुण्याजवळील रांजणगाव येथील 3ए कंपोजझिट्सच्या अत्याधुनिक प्रकल्पात अलुकोड्युअल या उत्पादनाचे



संशोधन, रचना, विकास आणि निर्मिती झाली आहे. अलुकोड्युअल हे लॅमिनेटेड ॲल्युमिनियमच्या थरांसह प्री-कोटेड इंजिनियर्ड सॉलिड शीट आहे. याचा उपयोग मुख्यत्वे फसाड्स, क्लॅडिंग व कर्टन वॉल्स, आतील भिंती, छत, सोफिट आणि कॉलम्सच्या सजावटीसाठी करता येईल. आर्किटेक्चरल दृष्टिकोनातून क्लॅडींगसंबंधी गरजा, वापर आणि वैशिष्ट्यांचे विश्लेषण करून, 'परिपूर्ण सपाटपणा' देण्याचे प्रमुख वैशिष्ट्य प्रदान करण्यासाठी अलुकोड्युअलची रचना करण्यात आली आहे, जे सामान्यतः स्टॅंडर्ड पोस्ट-कोटेड सॉलिड शीट्ससह साध्य करणे आव्हानात्मक असते. शिवाय, समान जाडीच्या ॲल्युमिनियमच्या एकाच शीटच्या तुलनेत, अलुकोड्युअल वाढीव कडकपणा देतात. या संरचनात्मक स्थिरतेमुळे उत्पादनाचा वापर मोठ्या कॅसेट आणि पॅनेलमध्ये केला जाऊ शकतो, ज्यामुळे सांध्यांची संख्या आणि एकूण खर्च प्रभावीपणे कमी होतो. हे उत्पादन अधिक आणि गुंतागुंतीच्या 'ऑन-साइट' लागणाऱ्या क्लॅडिंगच्या आवश्यकतांनुसार तयार केले गेले आहे. अलुकोड्युअलचे गंज-मुक्त असलेले मरीन ग्रेड अलॉय उत्पादनाला दीर्घकालीन टिकाऊपणा देते.

3ए कंपोझिट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रणजीत शर्मा म्हणाले, "अलुकोड्युअल हे आमचे पूर्णतः नवीन असे स्वदेशी संशोधन आणि विकसित केलेले 'मेक-इन-इंडिया' उत्पादन आहे, जे आता भारतात आणि जागतिक स्तरावर आणण्यास तयार आहे. अलुकोड्युअल आर्किटेक्ट्सना मोठमोठी स्ट्रक्चर्स तयार करण्यासाठी पातळ, मजबूत; तरीही सहजपणे आकार देता येईल अशा क्लॅडिंग सामग्रीची रचना आणि वापर करण्यास मदत करेल. यामुळे विमानतळ, शॉपिंग मॉल्स, स्टेडियम, गगनचुंबी व्यावसायिक आणि निवासी इमारती यासारख्या प्रकल्पांमध्ये वैविध्य व नावीन्यपूर्ण रचना करण्याची एक नवीन लाट येईल. आम्ही आमच्या भारतीय उत्पादन केंद्राला जगभरात, विशेषतः आशिया-पॅसिफिक आणि मध्य-पूर्व देशांना अलुकोड्युअलचा पुरवठा करण्यासाठी जागतिक केंद्र बनवत आहोत".

अलुकोड्युअलमध्ये अग्निरोधक गुणधर्मही आहे. तसेच, हे उत्पादन थ्री - डी आकार आणि जटिल भौमितिक नमुने प्राप्त करण्यासाठी लागणारी कार्यक्षमता प्रदान करते. यामुळे विविध आर्किटेक्चरल उपयोगांसाठी ते वैविध्यपूर्णरित्या वापरता येईल. अलुकोड्युअल मेटॅलिक्स, सॉलिड फिनिशेसमध्ये व चैतन्यदायी रंगांत, तसेच ग्रोव्ह (वुड लूक), एनोडाइज्ड लूक, कॉंक्रीट लूक, ऑरगॅनिक्स एलिगन्स (सुपर ग्लॉसी म्यूटेड टोन) आणि कलरस्केप्स यासारख्या वैशिष्ट्यपूर्ण रंगांमध्ये आणि सरफेस रंगांत येते. सध्या, कंपनी आपल्या समर्पित आणि सुस्थापित विक्री जाळ्याच्या माध्यमातून या नवीन उत्पादनासह भारतातील प्रमुख बाजारपेठांमधील आर्किटेक्ट्स, विकासक आणि फॅब्रिकेटर्स यांच्यापर्यंत पोहोचण्यावर लक्ष केंद्रित करीत आहे.

# 'एससीओए'ने 2024 मध्ये तीन हजारांपेक्षाही अधिक उमेदवारांना प्रशिक्षण

**बंगळुरु (दै. आरंभ पर्व)**

फ्लिपकार्ट या देशांतर्गत ई-कॉमर्स भारतीय कंपनीने ई-कॉमर्सच्या पुरवठा साखळी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि प्रमाणित करण्यासाठी एक आद्य उपक्रम म्हणून 'सप्लाय चेन ऑपरेशन्स अ‍ॅकॅडमी' (एससीओए) या संस्थेची स्थापना केली आहे. अत्यंत वेगाने वाढणाऱ्या ई-कॉमर्स क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आणि स्थानिक पुरवठा साखळी परिसंस्था मजबूत करण्यात मदत करण्यासाठी एससीओए चांगल्या सेवेपासून वंचित असलेल्या स्थानिक भागांमधील तरुणांना मोफत व




उद्योगाभिमुख प्रशिक्षण देत आहे. 'एससीओए'ने २०२४ मध्ये तीन हजारांपेक्षाही अधिक उमेदवारांना प्रशिक्षण दिले आहे. त्यामध्ये २० टक्के महिलांचा समावेश आहे. यावरून फ्लिपकार्टची विविधतेप्रति आणि सर्वसमावेशकतेप्रति असलेली बांधिलकी स्पष्ट होते. या उपक्रमातील सहभागींना फ्लिपकार्टच्या सुविधा आणि ऑनलाइन वर्ग सत्रांमध्ये ४५ दिवसांमध्ये प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून प्रत्यक्ष काम करताना आवश्यक असलेली कौशल्ये प्राप्त करता येतात.

स्थानिक तरुण, महिला, ईडीएबी (दिव्यांग व्यक्ती), संरक्षण कर्मचारी आणि ट्रान्सजेंडर समूहातील व्यक्तींपर्यंत विशिष्ट कार्यक्रम पोहोचत असतात. यामुळे ई-कॉमर्स क्षेत्रातील रोजगारक्षमतेत सुधारणा झाली आहे.

वरिष्ठ उपाध्यक्ष आणि कस्टमर एक्सिपिरियन्स आणि रिकॉमर्स पुरवठा साखळीचे प्रमुख हेमंत बद्री यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'फ्लिपकार्ट देशातील लाखो स्थानिक कंपन्यांना त्यांच्या ई-कॉमर्स कार्यात मदत करण्यासाठी आणि देशाच्या सर्वसमावेशक आर्थिक विकासात योगदान देण्यासाठी दृढपणे बांधील आहे. 'सप्लाय चेन ऑपरेशन्स अ‍ॅकॅडमी' विद्यार्थ्यांना आणि संभाव्य व्यावसायिकांना ई-कॉमर्स, रिटेल आणि गोदामासंबंधीची (वेअरहाउस) उपयुक्त कौशल्ये प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करते. हा उपक्रम देशातील वेगाने विकसित होत असलेल्या ई-कॉमर्स क्षेत्रासाठी तरुणांना आवश्यक कौशल्ये मिळवून देण्यासाठी दृढपणे काम करतो. या उपक्रमामुळे लोकांचे जीवन बदलून जातेच, शिवाय पात्र कर्मचाऱ्यांसाठी तातडीची मागणी पूर्ण करून देशातील उद्योगाच्या भविष्याला आकार मिळतो.'

एससीओए देशातील तरुणांना आर्थिक अडथळे न येता कौशल्य वाढवता येईल, या दृष्टीने मदत करतो. यामुळे व्यावसायिक विकास सर्वांसाठीच सुलभ होतो. फ्लिपकार्ट अभ्यासक्रमाचे व्यवस्थापन करतो. त्यामुळे उद्योगाच्या वेगवान मागणीनुसार तयार केलेला परिपूर्ण आणि अल्पावधीतच अधिक अनुभव देणारा अभ्यासक्रम उपलब्ध झाला आहे. एससीओए उपक्रमात सहभागी झालेल्यांना उद्योगाशी संबंधित कौशल्ये मिळतात, त्यामुळे सहभागींना त्यांच्या आवडीनुसार वैविध्यपूर्ण ई-कॉमर्स क्षेत्रात काम करता येऊ शकते. या अभ्यासक्रमात आता गोदामाशी संबंधित प्रशिक्षण मोड्युलचा समावेश करण्यात आला आहे. या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना पिकर, पुटर, पॅकर (पॅकिंग), सेग्रेगेटर, सॉर्टर (वेगवेगळे करणे), क्वालिटी चेक एक्झिक्युटिव्ह (गुणवत्ता दर्जावर देखरेख ठेवणारे), डेटा एंट्री ऑपरेटर आणि इश्यु रिझोल्युशन एक्झिक्युटिव्ह (समस्यांचे निवारण करणारे) अशांसारख्या महत्त्वाच्या पदांवर काम करणे शक्य होते. ई-कॉमर्स पुरवठा साखळी क्षेत्रातील बदलत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षणार्थी सज्ज आहेत का, याची खात्री करणे आणि देशातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या या व्यवसायांसाठी गुणवान कर्मचारी उपलब्ध करून देणे, हा या सर्वसमावेशक दृष्टिकोनाचा उद्देश आहे.

गेल्या काही वर्षांत, फ्लिपकार्टने देशभरातील हजारो पुरवठा साखळी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. या प्रशिक्षणामुळे त्यांना आपली कौशल्ये वाढवण्यासाठी आणि अधिक चांगल्या रोजगार संधी मिळवण्यासाठी मदत झाली आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.